सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात, कृषि विद्यापीठांना ०४- निवृत्तीवेतन विषयक खर्च व ३६- सहायक अनुदान (वेतन) करीता अनुदान वितरीत करण्याबाबत (कार्यक्रम व अनिवार्य)....

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : कृषिवि-३७२२/प्र.क्र.७८/७-अे,**
**दिनांक : २८ एप्रिल, २०२२.**

**वाचा :-** १)वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि.०४.०४.२०२२ व दि.०५.०४.२०२२ चे अर्धशासकीय पत्र.
२) कृषि विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दि.०८/०४/२०२२.

**शासन निर्णय :-**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता, राज्यातील चारही कृषि विद्यापीठांना मागणी क्र. डी-३, '२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण' या मुख्य लेखाशीर्षाखाली अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत ०४- निवृत्तीवेतन विषयक खर्च व ३६-सहायक अनुदान (वेतन) करीता १० टक्क्यांच्या मर्यादेत निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करण्यात आलेला आहे. याव्यतिरीक्त परिशिष्ट-अ (कार्यक्रम) करीता रु.४,८३,३०,०००/- ( अक्षरी रुपये चार कोटी त्र्याऐंशी लाख तीस हजार फक्त) व परिशिष्ट-ब (अनिवार्य) नुसार रु.१२२,९८,६७,८००/-( अक्षरी रुपये एकशे बावीस कोटी अठ्याण्णव लाख सदुसष्ट हजार आठशे फक्त) असे एकुण रु.१२७,८१,९७,८००/-( अक्षरी रुपये एकशे सत्तावीस कोटी एक्याऐंशी लाख सत्त्याण्णव हजार आठशे फक्त) एवढे अनुदान (१० टक्क्यांच्या मर्यादेत) वितरीत करण्यास शासन मंजुरी देत आहे.

२. सदर शासन निर्णयातील अनुदान हे खालील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून वितरीत करण्यात येत आहे.

१) वित्त विभागाच्या दि.०४.०४.२०२२ च्या परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

२) कृषि विद्यापीठांनी व कृषि परिषदेने उपलेखाशिर्ष / गट / योजना आणि बाबनिहाय वितरीत केलेला निधी संबंधीत योजनेतील जी पदे / बाबी, योजनेतर योजना म्हणून पुढे चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे, त्या पदांचे वेतन व भत्ते आणि अनुज्ञेय बाबींसाठीच फक्त खर्च करावा. काही पदे रिक्त असल्यामुळे अथवा अन्य बाबी / कारणांमुळे एखाद्या योजनेखाली अनुदान अखर्चित राहील्यास, पुढील महिन्यामध्ये वितरीत करण्यात येणा-या अनुदानामध्ये समायोजित करावे.

३) उपलेखाशिर्षनिहाय, गटनिहाय, योजनानिहाय व बाबनिहाय वितरीत केलेला निधी कोणत्याही कारणास्तव अखर्चित / शिल्लक राहीला / राहणार असेल तर सदर अखर्चित / शिल्लक निधी

शासनाचे मान्यतेशिवाय इतर गटांसाठी / योजनांसाठी / बाबींसाठी परस्पर वर्ग करु नये किंवा खर्च करु नये.

४) उपलेखाशिर्षनिहाय मंजूर योजनांचे व त्या अंतर्गत मंजूर असलेल्या पदांचे सुधारित आकृतीबंधानुसार व्यवस्थितरित्या गटनिहाय वर्गीकरण केले आहे किंवा कसे याची कृषि परिषदेने / विद्यापीठाने सखोल तपासणी करावी. सदर वर्गीकरणामध्ये शासनाच्या मान्यतेशिवाय कोणतेही बदल करु नयेत.

५) प्रत्येक गटामधील वितरीत केलेले सहाय्यक आणि महसूली उत्पन्न त्या गटातील अनुज्ञेय बाबींवरील खर्च भागविण्यासाठी आणि विकास कामे करण्यासाठी उपयोगात आणावे. एका गटाचे सहायक अनुदान आणि महसूली उत्पन्न दुस-या गटातील योजनां / बाबींसाठी वर्ग करु नये. एखाद्या गटातील योजनेसाठी जास्त सहायक अनुदान वितरीत झाले असेल तर, पुढील निधीची मागणी करताना सदर जास्तीचे अनुदान विचारात घेऊन तेवढ्या कमी व अनुज्ञेय निधीची मागणी करावी.

६) शासनाने मंजूर केलेल्या पदांपैकी जी पदे महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० मधील तरतूदीप्रमाणे भरलेली आहेत व सदर पदे योजनेतर खर्चाने पुढे चालू ठेवण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे, अशा पदांच्या वेतन व भत्त्यांसाठीच विहीत अनुदान देय राहील.

७) प्रत्येक उपलेखाशीर्ष / गट/योजना आणि बाब निहाय स्वतंत्र लेखे / हिशोब ठेवावेत.

८) ज्या योजनांतर्गत / योजनेतर योजनांचा कालावधी संपलेला आहे, अशा योजना संबंधित कालावधीनंतर शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय योजनेतर/योजनांतर्गत खर्चाने पुढे चालू ठेऊ नयेत.

९) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने, कृषि विद्यापीठांना मंजूर केलेले सहाय्यक अनुदान, अनुदान सुत्राप्रमाणे बरोबर आहे किंवा कसे, तसेच विहीत आदेश / कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येत आहे किंवा कसे, याबाबत प्रत्येक आर्थिक वर्षाचा मुल्यमापन अहवाल शासनास संबंधित आर्थिक वर्ष समाप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावा. तसेच, मागील आर्थिक वर्षाचा अखर्चित निधी किती आहे हे तात्काळ शासनास कळवावे.

१०) शासनाने विद्यापीठाच्या काही नवीन योजनांना मान्यता देताना, सदर योजनेमधील पदे अंतर्गत समायोजनाने उपलब्ध करण्यास/भरण्यास मान्यता दिलेली आहे. यामुळे सदर नवीन योजनेसाठी नवीन पदे निर्माण झाल्यामुळे, ज्या योजनेतर / योजनांतर्गत मूळ योजनांमधील पदे अंतर्गत समायोजनाने नवीन योजनेकरिता वर्ग / उपलब्ध केली असतील, त्या मूळ योजनांमधील पदांचे वेतन व भत्यासाठी या आदेशान्वये वितरीत केलेला निधी खर्च करु नये. तसेच तिमाही अनुदानाची मागणी करताना, अशा पदांचे वेतन व भत्यासाठी लागणा-या निधीची मागणी करु नये.

११) कृषि विद्यापीठांना त्यांचे महसूली उत्पन्न वापरण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. याबाबत विद्यापीठाने विहीत आदेश आणि कार्यपध्दतीनुसार उचित कार्यवाही करावी. तसेच महसूली उत्पन्न वाढविण्याच्या योजना राबविण्याबाबत कार्यवाही करावी.

१२) विद्यापीठांना मंजूर करण्यात आलेले अनुदान महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९०, आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता १९९१ मधील तरतूदीप्रमाणे आणि प्रचलित शासन आदेश व विहित कार्यपध्दतीनुसार सक्षम अधिका-यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतल्यानंतर विहीत मर्यादेत खर्च करण्यात यावे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा अनुदान वितरीत केले आहे म्हणून खर्च करु नये.

१३) सन २०२२-२३ मधील अनुदानाची मागणी करताना, विद्यापीठाने दरमहा १० तारखेपर्यंत योजनानिहाय वितरीत केलेले अनुदान, प्रत्यक्ष खर्च आणि शिल्लक अनुदान याबाबतचा अहवाल सादर करावा. यापुढे अनुदानाची मागणी सादर करताना, पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानातील शिल्लकीची प्रस्तावित मागणीशी सांगड घालून, प्रत्यक्षात आवश्यक तेवढ्याच अनुदानाची मागणी करण्यात यावी.

१४) नियमबाह्य योजना पदे आणि बाबींसाठी खर्च करु नये.

विद्यापीठाच्या नियंत्रक आणि इतर संबंधित सक्षम प्राधिका-यांनी उपरोक्त अटी व शर्तींचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

३. या प्रित्यर्थचा खर्च सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून मासिक निधी विवरणपत्राच्या मर्यादेत भागवावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर, उपविभागीय कृषि अधिकारी, दापोली, जि. रत्नागिरी, उपविभागीय कृषि अधिकारी, अकोला व उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी या आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित उपशीर्षांतर्गत मंजूर केलेले अनुदान शासन निर्णय क्रमांक कृषि व सहकार विभाग क्रमांक अजीयु-१०७२/१८४७१/व्ही, दिनांक २७ सप्टेंबर १९७२ आणि शासन निर्णय क्रमांक कृषिवि- २००३/सीआर-३५/२०-अे, दिनांक २५/४/२००३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कृषि विद्यापीठांचे संबंधित नियंत्रक यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५. हे आदेश महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ व १४४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार तसेच वित्त विभागाच्या दि.०४.०४.२०२२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मिताली चौधरी )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
२. सदस्य सचिव तथा महासंचालक / सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,

३. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
४. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
५. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
६. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
७. उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर /दापोली / अकोला / परभणी,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर / उपकोषागार अधिकारी, राहुरी, जि. अहमदनगर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी / उपकोषागार अधिकारी, दापोली, जि.रत्नागिरी,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला / उपकोषागार अधिकारी, अकोला, जिल्हा अकोला,
११.जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी / उपकोषागार अधिकारी, परभणी, जिल्हा परभणी,
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१३.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१४.उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१५.अवर सचिव/कक्ष अधिकारी (का. ६अे /२अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२,
१६.कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
१७.कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४३१), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
१८.कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. कृषिवि-३७२२/प्र.क्र.७८/७अे, दि. २८/०४/२०२२ चे सहपत्र

परिशिष्ठ - अ

(कार्यक्रम अंतर्गत अनुदान वितरण)

(रु. हजारात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | उद्दिष्ट / बाब | आहरण व संवितरण अधिकारी | सन २०२२-२३ करिता अर्थसंकल्पीय तरतूद | यापुर्वी १० टक्के मर्यादेत वितरीत केलेले अनुदान | अर्थसंकल्पीय तरतुदीच्या १० टक्के वितरीत करावयाचे अनुदान | एकुण वितरीत अनुदान (६+७) (२० टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा - अहमदनगर | | | | | | |
| १ | ०१, पीक संवर्धन १२०, इतर संस्थाना सहाय्य (००)(०६) म.फु.कृ.वि.ला सहायक अनुदान (२४१५ ००७२) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उप विभागीय कृषि अधिकारी,अहमदनगर | १५००००.०० | १५०००.०० | १५००० | ३००००.०० |
| | ब) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा - रत्नागिरी | | | | | | |
| २ | ०१, पीक संवर्धन १२०, इतर संस्थाना सहाय्य(००)(०७)डॉ.बा.सा.को.कृ.वि.ला सहायक अनुदान (२४१५ ००८१) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उप विभागीय कृषि अधिकारी, दापोली | १७३३००.०० | १७३३०.०० | १७३३० | ३४६६०.०० |
| | क)डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, जिल्हा - अकोला | | | | | | |
| ३ | ०१, पीक संवर्धन १२०, इतर संस्थाना सहाय्य(००)(०८) डॉ.पं.दे.कृ.वि.ला सहायक अनुदान(२४१५ ००९९) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उप विभागीय कृषि अधिकारी,अकोला. | ६००००.०० | ६०००.०० | ६००० | १२०००.०० |
| | ड) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | | | | | | |
| ४ | ०१, पीक संवर्धन १२०, इतर संस्थाना सहाय्य(००)(०९) ) व.ना.म.कृ.वि.ला सहायक अनुदान (२४१५ ०१०५) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उप विभागीय कृषि अधिकारी,परभणी | १०००००.०० | १००००.०० | १०००० | २००००.०० |
| | | | एकुण १ ते ४ | ४८३३००.०० | ४८३३०.०० | ४८३३० | ९६६६०.०० |

(अक्षरी रुपये- चार कोटी त्र्याऐंशी लाख तीस हजार फक्त)

मिताली चौधरी

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट – ब

### (अनिवार्य अंतर्गत अनुदान वितरण)

(रु. हजारात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | उद्दिष्ट / बाब | आहरण व संवितरण अधिकारी | सन २०२२-२३ करीता अर्थसंकल्पित तरतूद | यापुर्वी १० टक्के मर्यादेत वितरीत केलेले अनुदान | अर्थसंकल्पीय तरतूदीच्या १० टक्के वितरीत करावयाचे अनुदान | एकुण वितरीत अनुदान (६+७) (२० टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा-अहमदनगर | | | | | | |
| ०१) | ०१ पीकसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०१) म.फु.कृ.वि.ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ००२५) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर | २११५५४७.०० | २११५५४.७० | २११५५४.७ | ४२३१०९.४० |
| | | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | | २२५१५०२.०० | २२५१५०.२० | २२५१५०.२ | ४५०३००.४० |
| | | | एकूण | ४३६७०४९.०० | ४३६७०४.९० | ४३६७०४.९ | ८७३४०९.८० |
| ०२) | ०३ पशुसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०१) म.फु.कृ.वि.ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ०१९७) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उपविभागीय कृषि अधिकारी,अहमदनगर | ४५३४४.०० | ४५३४.४० | ४५३४.४ | ९०६८.८० |
| ०३) | ८० सर्वसाधारण (००)(०२)महात्मा फुले कृषि विद्यापीठाला कर्मचा-यांच्या अंशदानाच्या रकमे इतकी समतुल्य अंशदानाची रक्कम देण्यासाठी सहायक अनुदान( अनिवार्य)-२४१५१०२१ | ०४,निवृत्ती वेतनविषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, अहमदनगर | ७१५१२.०० | ७१५१.२० | ७१५१.२ | १४३०२.४० |
| | | | एकूण (१ ते ३) | ४४८३९०५.०० | ४४८३९०.५० | ४४८३९०.५ | ८९६७८१.०० |
| | ब) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा-रत्नागिरी | | | | | | |
| ०४) | ०१पीकसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०२) डॉ.बा.सा.को.कृ.वि.ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ००३४) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी,दापोली | ५४२८८२.०० | ५४२८८.२० | ५४२८८.२ | १०८५७६.४० |
| | | ३६, सहायक अनुदाने(वेतन) | | १२२८००७.०० | १२२८००.७० | १२२८००.७ | २४५६०१.४० |
| | | | एकूण | १७७०८८९.०० | १७७०८८.९० | १७७०८८.९ | ३५४१७७.८० |
| ०५) | ०३ पशुसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०२) डॉ.बा.सा.को.कृ.वि. ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ०१७९) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी,दापोली | ४३०२१.०० | ४३०२.१० | ४३०२.१ | ८६०४.२० |
| | | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | | १९१५३.०० | १९१५.३० | १९१५.३ | ३८३०.६० |
| | | | एकूण | ६२१७४.०० | ६२१७.४० | ६२१७.४ | १२४३४.८० |
| ०६) | ०५मत्स्यव्यवसाय १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०२) डॉ.बा.सा.को.कृ.वि. ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ०२४१) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, दापोली | ४४०५४.०० | ४४०५.४० | ४४०५.४ | ८८१०.८० |
| | | ३६, सहायक अनुदाने(वेतन) | | १६४२१६.०० | १६४२१.६० | १६४२१.६ | ३२८४३.२० |
| | | | एकूण | २०८२७०.०० | २०८२७.०० | २०८२७ | ४१६५४.०० |
| ०७) | ८० सर्वसाधारण (०० (०१)डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाला कर्मचा यांच्या अंशदानाच्या रकमे इतकी समतुल्य अंशदानाची रक्कम देण्यासाठी सहायक अनुदान(अनिवार्य) (२४१५१०१२) | ०४,निवृत्ती वेतनविषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी,दापोली | ६१२३४.०० | ६१२३.४० | ६१२३.४ | १२२४६.८० |
| | | | एकूण (४ ते ७) | २१०२५६७.०० | २१०२५६.७० | २१०२५६.७ | ४२०५१३.४० |
| | क) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | | | | | | |
| ०८) | ०१पीकसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०३) डॉ.पं.दे.कृ.वि.लासहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ००४३) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, अकोला | ११७२१८१.०० | ११७२१८.१० | ११७२१८.१ | २३४४३६.२० |
| | | ३६ सहायक अनुदाने(वेतन) | | १६६९४२५.०० | १६६९४२.५० | १६६९४२.५ | ३३३८८५.०० |
| | | | एकूण | २८४१६०६.०० | २८४१६०.६० | २८४१६०.६ | ५६८३२१.२० |
| ०९) | ०५मत्स्यव्यवसाय १२० इतर संस्थाना सहाय्य(००) (०३) डॉ.पं.दे.कृ.वि.ला सहायक अनुदान (अनिवार्य) (२४१५ ०२६८) | ३६, सहायक अनुदाने(वेतन) | उपविभागीय कृषि अधिकारी,अकोला | २३७७.०० | २३७.७० | २३७.७ | ४७५.४० |
| | | | एकूण | २३७७.०० | २३७.७० | २३७.७ | ४७५.४० |
| १०) | ८० सर्वसाधारण (००)(०५)डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला कर्मचा-यांच्या अंशदानाच्या रकमे इतकी समतुल्य अंशदानाची रक्कम देण्यासाठी सहायक अनुदान(अनिवार्य)-२४१५१०५९ | ०४,निवृत्ती वेतनविषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी,अकोला | ४१६२६.०० | ४१६२.६० | ४१६२.६ | ८३२५.२० |
| | | | एकूण (८ ते १०) | २८८५६०९.०० | २८८५६०.९० | २८८५६०.९ | ५७७१२१.८० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ड) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, जिल्हा परभणी** | | | | | | | |
| ११) | ०१पीकसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०४) व.ना.म.कृ.वि.ला.सहायक अनुदान(अनिवार्य) (२४१५ ००५२) | ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | १०२२४५५.०० | १०२२४५.५० | १०२२४५.५ | २०४४९१.०० |
| | | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | | १७००९२२.०० | १७००९२.२० | १७००९२.२ | ३४०१८४.४० |
| | | | **एकूण** | **२७२३३७७.००** | **२७२३३७.७०** | **२७२३३७.७** | **५४४६७५.४०** |
| १२) | ०३पशुसंवर्धन १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०४) व.ना.म.कृ.वि.ला.सहायक अनुदान (अनिवार्य)(२४१५ ०२०३) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | १९२८५.०० | १९२८.५० | १९२८.५ | ३८५७.०० |
| | | | **एकूण** | **१९२८५.००** | **१९२८.५०** | **१९२८.५** | **३८५७.००** |
| १३) | ८० सर्वसाधारण (००)(०४) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाला कर्मचा-यांच्या अंशदानाच्या रकमे इतकी समतुल्य अंशदानाची रक्कम देण्यासाठी सहायक अनुदान(अनिवार्य) (२४१५१०४१) | ०४,निवृत्ती वेतनविषयक खर्च | उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी | ५७६८३.०० | ५७६८.३० | ५७६८.३ | ११५३६.६० |
| | | | **एकूण(११ ते १३)** | **२८००३४५.००** | **२८००३४.५०** | **२८००३४.५०** | **५६००६९.००** |
| **इ) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.** | | | | | | | |
| १४) | ०१ पीकसंवर्धन, १२० इतर संस्थांना सहाय्य (००) (०५) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेला सहायक अनुदान(अनिवार्य) (२४१५ ००६१) | ३६, सहायक अनुदाने (वेतन) | सहायक संचालक (लेखा-१) कृषि आयुक्तालय, पुणे | २६२५२.०० | २६२५.२० | २६२५.२ | ५२५०.४० |
| | | | **एकूण** | **२६२५२.००** | **२६२५.२०** | **२६२५.२** | **५२५०.४०** |
| **एकूण (अ+ब+क+ड+इ) अनिवार्य योजना (१ ते १४)** | | | | **१२२९८६७८.००** | **१२२९८६७.८०** | **१२२९८६७.८०** | **२४५९७३५.६०** |

**( रुपये- एकशे बावीस कोटी अठ्ठयाण्णव लाख सदुसष्ट हजार आठशे फक्त)**

मिताली चौधरी
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन